


# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

। वर्ष –१८, अंक–३० । छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १४ एप्रिल ते २० एप्रिल २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने –४


# भडकल गेट येथे सर्व पक्षीय उत्सव समितीच्या वतीने रात्री १२ वाजता केक कापून, फटाक्यांच्या आतिषबाजीत बाबासाहेबांना अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

डॉ. बाबासाहेब यांची १३४ वी जयंती संपूर्ण जगभरात उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजीनगरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या वतीने ७ एप्रिल २०२५ पासून विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. डॉ. बाबासाहेबाना ढोल–ताशांच्या गजरात फटाक्यांच्या आतीषबाजीत रात्री १२ वाजेच्या ठोक्याला केक कापून विनम्र अभिवादन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीतर्फे छत्रपती संभाजीनगरमध्ये उत्साहात साजरी करण्यात येत असून यावर्षी समितीच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. गेल्या ४० वर्षांपासून समिती विविध कार्यक्रमांचे आयोजन करत आहे, आणि यावर्षी सर्वपक्ष व संघटनांच्या सहकार्याने हे कार्यक्रम साजरे होणार आहेत. सरदार नवीनसिंग ओबेरॉय यांची सर्वानुम ते अध्यक्ष म्हणून अगोदरच निवड करण्यात आली होती. दानशूर व्यक्ती म्हणून त्यांची जनमानसात ख्याती आहे. याप्रसंगी समितीचे अध्यक्ष नवीनसिंग ओबेरॉय, मुख्य मार्गदर्शक बाबूराव कदम, अफसर खान, कय्युम भाई, बाळकृष्ण इंगळे, शिवाजी कवडे, इब्राहिम पठाण आर्दीची उपस्थिती होती. भीम सैनिकांनी भडकल गेट येथे बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी गर्दी केली होती. तरूण–तरूणी, महिला व पुरूष, विविध संघटना, जयंती समित्यांनी ढोल–ताशाच्या गजरात बाबासाहेबांना अभिवादन केले. ७ एप्रिल रोजी पोलिस आयुक्त प्रवीण कुमार यांच्या हस्ते उत्सव समितीच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले होते. सर्वच क्षेत्रात समितीकडून कार्य करण्यात आले. व विविध उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात आली.

## समितीचे आवाहन

समितीच्या वतीने सर्वजनतेला मिरवणूक शांततेत आणि उत्साहात पार पाडण्याचे आवाहन समितीचे अध्यक्ष अध्यक्ष नवीनसिंग ओबेरॉय यांनी सांगितले. आपल्या सर्व सण उत्सव निर्विघ्न पार पडत आहेत. तरी कोणीही जयंतीमध्ये चुकीचे वर्तन न करता कुठेही गालबोट लागणार नाही याची काळजी घ्यावी असे नवीनसिंग नवीनसिंग ओबेरॉय म्हणाले.






**१३ एप्रील रोजी श्री गुरू गोविंदसिंघजी चौकाचे सुशोभिकरण करण्यात आल्याने अखेर आज लोकार्पण करण्यात आले.**

# ट्रम्प यांच्या टॅरिफचा परिणाम : भारताचे जीडीपी वाढीचे अनुमान घटून ६.५ टक्के

सध्या विषय फक्त ट्रम्प यांनी भारतासह जगावर लादलेल्या टॅरिफचा आहे. त्यामुळे या विषयावर नवनवीन कोनांतून बातम्या आणि चर्चा केल्या जात आहेत. त्यात एक आहे ती म्हणजे भारताच्या जीडीपी वाढीचाही नवा अंदाज. या अंदाजानुसार, ट्रम्प यांच्या टॅरिफनंतर रिझर्व्ह बँकेने भारताच्या जीडीपी वाढीचा अंदाज घटवून ६.५ टक्के केला आहे. हा एक तसा अर्थव्यवस्थेला धक्काच आहे आणि तो ट्रम्प यांच्या घोषणेमुळे बसला आहे. भारताच्या कोणत्याही चुकीमुळे नाही, ही त्यातल्या त्यात दिलासादायक बाब आहे. आरबीआयने म्हटले आहे की, जागतिक आर्थिक आऊटलुक तीव्र गतीने बदलत आहे आणि सर्वच क्षेत्रांत टॅरिफच्या नवीन नियमांमुळे प्रचंड उलथापालथ घडली आहे. या आर्थिक आऊटलुकमळे भारताच्या सर्व क्षेत्रातील अनिश्चिततांना वाढवले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने बुधवारी म्हणजे ९ एप्रिल रोजी आपल्या तीनदिवसीय वित्तीय बैठकीनंतर नीतीगत दर रेपोरेट ०.२५ बेसिस पॉइंटनी घटवून ६ टक्के करण्याचा निर्णय घोषित केला. त्याबरोबरच जीडीपी विकासाचे अनुमानही घटवून तेही कमी केले आहे. भारताला हा दुहेरी धक्का आहे, पण भारताच्या अर्थव्यवस्थेत हा धक्का सहन करण्याची ताकद आता आली आहे असे म्हणावे लागेल. बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी म्हटले आहे की, अमेरिकेने टॅरिफच्या नवीन लावलेल्या नवीन नियमांमुळे भारतातील अनिश्चितता वाढवल्या आहेत.

रताच्या एकूण वाढीवर त्याचे आकलन करणे अत्यंत अवघड होऊन बसले आहे. त्यामुळे या अनिश्चिततांचा प्रभाव कसा आणि कितपत होईल आणि तो कोणत्या क्षेत्रांवर होईल याचा अंदाज करणे अत्यंत अवघड आहे. वाढीत सुधारणा होत आहे पण आमच्या अंदाजापेक्षा ती अत्यंत कमी आहे असे मल्होत्रा यांचे म्हणणे आहे. प्रथम वित्तीय अनुमान आरबीआयनेच ६.७ टक्के इतके केले होते. पण आता ते घटून ६.५ टक्क्यांवर आले आहे. आरबीआयने महागाईचे दरही कमी केले आहेत आणि चालू आर्थिक वर्षात हा दर ४ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. प्रथम हा दर ४.२ टक्के होता. त्याचबरोबर बँकेने वाढीचा दर घटवून तो ६.२५ टक्के केला.

यामुळे केंद्रीय बँकेच्या व्याजदरांमध्ये घट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. रिझर्व्ह बँकेने मुद्रास्फीती म्हणजे परकीय चलनाचे अनुम ानही घटवून ४ टक्के केले आहे. या वर्षी कृषी उत्पादन चांगले राहण्याची आणि कच्च्या तेलाच्या किमतीत घट ध्यानात घेऊन रिझर्व्ह बँकेने म हागाईचा दर कमी केला होता.

ग्राहक किंमत निर्देशांकाच्या आधारे रिटेल इन्फ्लेशन म्हणजे किरकोळ महागाई १.६ टक्के घटून ५.२ टक्के वर आली होती. त्याहीपेक्षा एक गंभीर परिणाम समोर आला आहे तो म्हणजे, अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या टॅरिफमुळे सरकारच्या कमाईवर जोरदार नकारात्मक परिणाम झाला आहे. वाढत्या जागतिक अनिश्चिततांमुळे तसेच आर्थिक मंदीच्या कारणास्तव वित्तीय वर्ष २०२५–२६ मध्ये सरकारच्या महसुली संग्रहावर विपरित परिणाम झाला आहे.

# डॉ. आंबेडकर यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले

डॉ. बाबासाहेब म्हणजे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होय त्यांना प्रत्येक क्षेत्राचे परिपूर्ण ज्ञान व माहिती होती. सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, पत्रकारिता, कायदे, अशा विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने अमोघ वक्तृत्वाने व कुशल नेतृत्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीन, दलितांच्या श्रमिकांच्या विस्थापितांच्या, शोषितांच्या अंधकारमय जीवनाला प्रज्ञेचा संदेश दिला. गलीत गात्र झालेल्या मनामनातून समाजक्रांतीचे स्फुलिंग चेतवून डॉ. आंबेडकर यांनी मुर्दाड झालेल्या समाजाला आपल्या हक्काप्रती जागृत केले. शिक्षणरूपी वाघिणीचे दुध पिण्यास प्रवृत्त करून नव संजीवनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य अत्यंत उल्लेखनीय व समाजाला पोषक असे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर नुसते पुस्तकी पंडित नव्हते तर त्यांनी आपल्या आयुष्यात आचार आणि विचार यांची सांगड घातली आणि आपल्या तत्वज्ञानाला कृतीची जोड दिली. त्यांनी मनुष्य मात्रांच्या जीवनातील दु:ख, दारिद्र्य आणि क्लेश दूर करण्यासाठी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपले पूरे ज्ञान माहिती व बळ लावले आणि रंजल्या गांजल्या जनतेच्या तसेच स्त्री वर्गाच्या शेतकरी, मजूर वर्गाच्या आणि पद दलितांच्या उद्धारार्थ आपले प्राण पणास लावून समतेचं मंगलवाट आणि मानवतेची दिव्य ज्योत निर्माण करते ती व्यक्ती केवळ वंदनीय नव्हे तर ती व्यक्ती प्रेरक, उद्धारक व तारक शक्ती ठरते.


शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी शस्त्र आहे. शिक्षणाने माणसाला आपले कर्तव्य व हक्कांची जाणीव होते. समाजातील अस्पृश्य समाजाला स्वत्वाची जाणीव व्हावी यासाठी त्यांनी शिक्षणाचे महत्त्व समाजात विशद केले. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो पेईल तो माणूस गुरगुरल्या शिवाय राहणार नाही. असे समाज बांधवांना सांगत. प्राथमिक शिक्षण हे सर्व शिक्षणाचा पाया आहे, म्हणून ते शिक्षण अतिशय दर्जेदार व गुणवत्तेचे असावे असे सांगत. प्राथमिक शिक्षणाचे ध्येय असे असले पाहिजे की, मुलगा किंवा मुलगी एकदा शाळेत दाखल झाले की ते पूर्णपणे सुशिक्षित, माहितीपूर्ण व गुणवत्ता प्राप्त करूनच बाहेर पडावेत. शासनाने यासाठी लक्ष द्यायला हवे त्यांचे म्हणणे होते की, समाजाच्या सर्व थरापर्यंत शिक्षण गेले पाहिजे. शिक्षण प्राप्त झाल्याने व्यक्ती बौद्धिकदृष्ट्या सशक्त होतो. व्यक्तीला चांगले आणि वाईट यातील फरक समजायला लागतो. प्रज्ञा, शील आणि करूणा हे गुण प्रत्येकाच्या अंगी आणण्यासाठी शिक्षणाची गरज त्यांनी प्रतिपादन केलेली आहे. शाळेत मुलांना केवळ बाराखड्या शिकवू नये तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनावी. समाज हितार्थ या ज्ञानप्राप्त मुलांनी आपली सामाजिक बांधिलकीची कर्तव्य योग्य व समर्थपणे पार पाडावीत असे शिक्षण असावे.

शाळा म्हणजे उत्तम नागरिक व कर्तव्यदक्ष नागरिक बानविणारे कारखाने आहेत याचे भान या प्रक्रियेत भाग घेणाऱ्यांनी ध्यानी घ्यावे. पिपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना १९४६ साली करून त्यांनी मुंबईला सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादला मिलिंद महाविद्यालय सुरू केले. राष्टहित व समाजहिताचे भान ठेवणारेच खरे शिक्षण होय असे ते मानीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सत्याच्या मार्गावर चालणारे खरे मार्गदर्शक होते. भ्रष्टाचार, अनिती, अत्याचार, अन्यायास त्यांचा प्रखर विरोध होता. जातीभेदाच्या ते विरोधात होते. जातीभेद म्हणजे समाजाला लागलेली कीड ते मानत असत. ही सामाजिक कीड नष्ट केल्याशिवाय समाज एक संघ होणार नाही असे ते समजत. डॉ. आंबेडकर म्हणजे तळागाळातील लोकांना बौद्धिक व सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करून त्यांना समानतेचा मंत्र देणारे एक पथदर्शक होते. शिकल्याशिवाय आपल्यावरील न्याय, अन्याय, आपले हक्क ही आपल्याला कळत नाही. अशा प्रकारे त्यांनी सामाजिक क्रांतीचे रणशिंग समाजात फुंकले. डॉ. बाबासाहेबांच्या आचार-विचारांत राष्ट्रभक्ती भरलेली होती. डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा करताच तत्कालीन राष्ट्रीय नेते मंडळी घाबरली. त्यांना वाटले डॉ. आंबेडकर आता देश सोडून जाणार परंतु डॉ. आंबेडकरांनी सांगितले. 'आम्ही या भारत देशाची संतान आहोत, आम्हाला राष्ट्राची जाणीव आहेच, राष्ट्रावर संकट आल्यास प्राणपणाला लावून देशाचे रक्षण केले व करू सुद्धा' यात डॉ. आंबेडकरांची प्रखर राष्ट्रनष्ठा सामावलेली आहे. स्त्रियांना पुरूषांप्रमाणे समान हक्क मिळावेत यासाठी त्यांनी अनेक चळवळी केल्या. स्त्रियांची गुलामगिरी डॉ. आंबेडकरांनी दूर केली. १९२७ ते १९५६ पर्यंतच्या काळात बाबासाहेबांनी भारतीय स्त्रीचा सामाजिक, कायदेशीर आणि परकीय दर्जा वाढावा म्हणून सतत प्रयत्न केला. १९४२ साली भरलेल्या नागपूर येथील परिषदेत त्यांनी महिलांना सांगितले की, 'स्वच्छता पाळा, सर्व दुर्गूणापासून दूर रहा, मुलामुलींना शिक्षण द्या त्यांना महत्त्वाकांक्षी बनवा, त्यांचा न्यूनगंड दूर करा अशा महत्त्वाचा उपदेश केला. दलितांना त्यांचे हक्क मिळावे यासाठी त्यांनी त्यांच्या हक्कासाठी लढा दिला. श्रमजिवीच्या साठीही ते खंबीरपणे उभे राहिले. दलितांना मानाचे जीवन जगता यावे म्हणून ते सातत्याने संघर्ष करीत राहिले. केवळ दलितांसाठीच नव्हे तर शेतकरी व मजूर यांच्या प्रश्नासंबंधी जोरदार लढा दिला. अशा या महामानवाचे महान कार्य म्हणजे देशासाठी व समाजासाठीचे सामाजिक बांधिलकीचे कर्तव्य होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विश्वाला मिळालेली महान देणगी होय. त्यांच्या कार्याला आचरणात आणणे हाच त्यांचा व राष्ट्रीय सन्मान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त त्यांना त्रिवार अभिवादन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक व्यक्ती नसून एक विचार आहे !

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन म्हणजे भारतीय जनतेच्या न्याय व समतेसाठी लढयाची अविस्मरणीय गाथाच होय. दलितोत्ध्दारक, धर्मसुधारक, प्रकांडपंडीत, समाजशास्त्रज्ञ व संविधानाचे शिल्पकार असे विविध पैलू त्यांच्या जीवनाशी निगडीत आहेत. अशा या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा विचार करता, तत्कालीन सामाजिक, राजकिय प्रश्नांना ते कसे सामोरे गेलेत या प्रश्ना प्रमाणेच राष्ट्रीय एकात्मतेचा विचार ही त्यांनी केला. या सर्व बाबींचा मागोवा घेणे अभ्यासाचा विषय आहे. तेव्हा आपला समाज एक संघ असला पाहिजे, यावर त्यांचा अधिक भर होता. सर्व समाज शहाणा करुन सोडावा ही त्यांची कल्पना होती. तीच त्यांनी संविधानेत साकारली जे-जे आपणांसी ठावे, ते-ते इतरांशी सांगावे, शहाणे करुनही सोडावे सकल जण हा रामदासांचा संदेश त्यांनी आचरणात आणला आणि इतरांना सुध्दा सांगितला, या संदेशाकडे डोळेझाक करुन चालणार नाही.

स्वत: बरोबर इतरांचा विचार करुन त्यांनी राष्ट्रनिष्ठे पुढे इतर निष्ठा गौण मानल्या. आपण सर्व भारतीय आहोत ही भावना रुजविणे व वाढविणे महत्वाचे आहे. या निष्ठेपुढे कोणतीही निष्ठा स्पर्धा करु शकत नाही. संकुचित जातीय, धार्मिक किंवा राजकिय व अन्य स्वार्थासाठी त्यांनी राष्ट्रनिष्ठा सोडली नाही. त्यांची ही भावना स्वातंत्र्योत्तर काळात सत्तेत सहभागी होतांना (कायदामंत्री) असतांना शेडयुल्ड कास्ट फेडरेशन काढतांना, धर्मांतराची घोषणा करतांना अशा महत्वाच्या जीवनप्रसंगी सतत निष्ठा जागी राहिल्याचे दिसेल. त्यामुळे खऱ्या अर्थाने त्यांना राष्ट्रपुरुष संबोधले गेले पाहिजे. त्याला कारण ही तसेच! ते म्हणाले, मी प्रथम भारतीय आणि शेवटपर्यंत भारतीयच! अशा महान विद्यात्याला वगळून खरोखरच हा देश मोठा झाला असता काय? याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे.



डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या लोकशाही तत्त्वांचा पुरस्कार करणारे अनेक ग्रंथ लिहिले, भाषणे दिली आणि आपली दलिताबद्दलची भूमिका स्पष्ट केली. त्यांच्या प्रेरणेने शाळा, प्र-शाळा तर निघाल्याच पण उच्च शिक्षण देणारी महाविद्यालयेही निघाली. शिक्षण, समाजकल्याण, अर्थकरण, राजकरण या सर्वामध्ये त्यांनी आपले स्वतंत्र, तर्कशुध्द विचार मांडून दाखविले. त्यांच्या ठायी असलेल्या अर्थकारणामुळे भारतीय रिजर्व्ह बँक उदयास आली, हे ही विसरुन चालणार नाही. दलित समाजात जागृती होत गेली तेव्हा त्यांना ज्ञानाचे महत्व पटले. अनेक दलित आज समाजात विचारवंत म्हणून मान्यता पावले आहेत, त्यामागे डॉ बाबासाहेबांची प्रेरणा आहे. समाजाने त्यांच्या विषयीचा आदर अनेक प्रकारे व्यक्त केला आहे.

आज त्यांचे नाव दिलेली कितीतरी विद्यालये, महाविद्यालय, विद्यापीठे कार्यरत आहेत. ही त्यांच्या विद्वत्तेची पावती म्हणावी लागेल, जी जगमान्य ठरली. कितीतरी विद्यार्थ्यांनी त्यांच्या विषयावर 'डॉक्टरेट' मिळिवणाऱ्यांची संख्या ज्याची मोजदाद करता येणार नाही. त्यामुळे त्यांच्या विद्वत्तेची प्रचिती लक्षात येते.

डॉ. बाबासाहेबांनी बडोदे सरकारची शिष्यवृती मिळवून एल्फिन्स्टन कॉलेजात प्रवेश घेतला. कॉलेजात शिक्षण देखील भीमा महार असल्यामुळे त्याला योग्य मार्गदर्शन व मदत मिळाली नाही. तरीही तशाच परिस्थितीत भीमराव एल्फिन्स्टन कॉलेज मधुन १९१२ साली बी.ए. झाले. बडोद्याच्या महाराजांच्या ऋणातून अल्पसे मुक्त होण्यासाठी त्यांनी त्यांचेकडे नोकरीचा अर्ज केला त्यांना सयाजीराव गायकवाडांच्या कडे नोकरी मिळाली. परंतु वडील आजारी असल्याची तार मिळताच डॉ. आंबेडकर मुंबईस निघाले. सुरत स्टेशनवर वडिलांसाठी बर्फी घ्यावी म्हणून ते उतरले असताना गाडी निघून गेली. त्यामुळे घरी पोहोचण्यास त्यांना उशीर झाला. वडिलांचे डोळे मुलाला पाहण्यासाठी आतूर झाले होते. मुलगा आल्याचे कळताच त्यांनी डोळे उघडले.

आपल्या लाडक्या मुलाच्या अंगावरुन प्रेमाने हात फिरविला आणि त्या महान पुरुषाने हया जगाचा शेवटचा निरोप घेतला.

पुढील शिक्षणासाठी बडोद्याचे प्रागतिक राजे सयाजीराव गायकवाडांनी शिष्यवृत्ती देऊन त्यांना अमेरिकेत पाठविले. आपण केवळ शिक्षणासाठी अमेरिकेत आलो आहोत याची जाणीव भीमरावांना होती. एखाद्या तपस्व्या प्रमाणे त्यांनी उपासना केली. ते अभ्यासात दिवसाचे अठरा तास घालवू लागले. १९१५ साली ते एम.ए. झाले. पैसा जमवला व १९२० साली ते अपुरा अभ्यास करण्यासाठी पुन्हा एकदा लंडनला रवाना झाले. तिथे ते सकाळी आठ ते संध्याकाळी पाचपर्यंत निरनिराळया ग्रंथालयात पुस्तके वाचीत आणि रात्री दहानंतर दिवस उजाडेपर्यंत त्यांचा अभ्यास चालू असे. १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना दिलेली 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी होय. त्यानंतर त्यांनी निरनिराळया विषयांवर दोन-तीन प्रबंध लिहिले. हया कष्टांचे फळ म्हणून १९२४ साली कोलंबिया विद्यापीठाने त्यांना ङ्गडॉक्टर ऑफ फिलॉसॉफीङ्क ही पदवी दिली.

सामाजिक समतेसाठी त्यांनी महाडच्या तळयातील सर्वांसाठी म्हणजेच अस्पृश्यांना पाणी मिळत नव्हते. पाणी म्हणजे जीवन, तेच त्यांच्यापासून हिरावून घेतले यासाठी सत्याग्रह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला. मार्च १९२७ रोजी सत्याग्रही तळयाकडे निघाले. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी जे पाणी, ते मिळवायचेच एवढयासाठी चालेले होते. डॉ. आंबेडकर सर्वांच्या पुढे होते. अस्पृश्य म्हणून मुंबईच्या कॉलेजात ज्यांनी पाण्याचे हाल सोसले, बडोद्याच्या हॉटेलमध्ये ज्यांनी मार खाल्ला ते खरोखरच सत्याग्रहींचे सेनापती शोभत होते. सर्वजण तळयाजवळ येऊन पोहोचले. प्रथमत: त्यांनी पाण्याचा घोट घेऊन इतरांना पाणी पिण्याची मोकळीक दिली.

तसेच नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळवण्यासाठी ५ वर्षे सतत झगडत राहिले शेवटी १९३५ मध्ये काळाराम मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. अन् त्याचवेळी बौध्द धर्म स्विकारणार अशी घोषणा त्यांनी येवले (नाशिक) या ठिकाणी केली. लगेच त्यांनी सिडेनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची जागा मिळवली. बहिष्कृत वर्गावर वर्षानुवर्षे जो अन्याय होत आलेला आहे तो वेशीवर टांगून त्याचे निराकरण झाले पाहिजे ही त्यांची मागणी होती. बहिष्कृतांचा हा लढा लढतांना त्यांनी नेमकी विधायक आणि व्यापक भूमिका घेतली आणि अस्पृश्य समाजाला स्वत: हुन काही करावेसे वाटावे या दृष्टीने त्यांच्यात चैतन्य निर्माण करायचे अशा दृष्टीने त्यांनी आपल्या कार्याची पाऊले पुढे टाकण्यास सुरुवात केली.

आपल्या भारत देशात इंग्रजांचे राज्य होते. चले जाव चा नारा देऊन इंग्रजांना देश सोडावा लागला आणि नंतर १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र्य झाला. भारतातल्या लोकांना विशिष्ट पध्दतीने राज्यकारभार करता यावा यासाठी भारताची स्वतंत्र्य राज्यघटना असणे आवश्यक झाले. त्या दृष्टीने भारतीय विद्वानांची एक घटना (तज्ञ) समिती नियुक्त करण्यात आली. तेव्हा पं. जवाहरलाल नेहरु व महात्मा गांधीनी ही जबाबदारी बॅरि. आंबेडकर यांच्यावर सोपविली, ती त्यांनी स्विकृत केली.

डॉ. बाबासाहेबांनी त्यांनी अहोरात्र जिद्द व चिकाटीने आपल्या अंगी असलेली सगळी बुध्दिमत्ता त्यांनी अहोरात्र प्राणपणाला लावून २ वर्षे ११ महिने १७ दिवसात घटना लिहून पुर्ण केली. दलित वर्गाचे पुढारी एवढ्या पुरतीच त्यांची भारतीय मान्यता नसून भारतीय स्वराज्यातील पहिले कायदेमंत्री पद त्यांना देण्यात आले. कायदा व घटनाशास्त्राचा त्यांचा गाढ अभ्यास हा त्यांच्या जीवनाचा एक स्वतंत्र पैलू होता. १९५० पासुन राज्यघटना अंमलात आली. डॉ. बाबासाहेबांनी लिहलेल्या संविधानामुळे भारताला जगात नावलौकिक मिळाले, असे म्हटले तर अतिश्योक्ती होणार नाही. तेव्हापासुनच त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जाऊ लागले. '

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर जेवढी जबाबदारी होती तेवढी जबाबदारी जगातील कोणत्याही पुरुषावर नव्हती. ते जर अजुन जगले असते तर कदाचित त्यांच्या मनासारखे निश्चित घडले असते, हे कोणीही नाकारु शकत नाही आणि एवढा मोठा कायदेतज्ञ असलेल्या या महात्म्याचे पूर्वजीवन मात्र अत्यंत वाईट गेले असतांना बेदरकारपणे आगपाखड करता आली असती, पण ती सुध्दा त्यांनी केली नाही. अशावेळी देखील बहिष्कृतांच्या चळवळीला वर्ग लढयाचे स्वरुप येणे सहज शक्य होते, त्यातून भारतीय एकसंघतेला तडा जाऊन धर्माच्या नांवावर या देशाची शकले झाली. तशी परिस्थिती उद्भवली असती परंतू 'भारतीय' हा त्यांचा स्थायीभाव होता. भारतीय समाजात त्यांना बदल हवा होता पण त्यासाठी समाजप्रबोधन हाच मार्ग होय, अशी त्यांची दृढनिष्ठा होती. त्यामुळेच राष्ट्रनिष्ठा त्यांनी कधी सोडली नाही. राष्ट्रीय एकात्मतेचा विचार त्यांनी सर्वात महत्वाचा मानला.

ङ्गपिकते तेथे विकत नाहीङ्क हा सिध्दांत माहित आहे. तेव्हा आपल्याजवळ असलेल्या माणसाचे गुण आपण ओळखु शकत नाही, दूसऱ्या माणसाला त्याची पारख होते हे सर्वविदित आहे, म्हणूनच १ जून १९५२ रोजी अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठाने ङ्गडॉक्टर ऑफ लॉङ्क ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक तत्वज्ञानांचा तसेच सामाजिक/राजकिय संघर्षाचा वारसा लाभलेला असल्यामुळे हा समुह मूळत: प्रस्थापित विरोधी आहे, त्यांचा हिंदु धर्मातील पाखंडी संताना विरोध होता.

भारत देशावर मात्र त्यांचे अलोट प्रेम होते, त्यामुळे हिंदु धर्मातून परधर्मात जाण्याचा विचार करतानाही भारतातच उगम पावलेल्या बौध्द धर्म याची नागपूर शहरात आपल्या लाखो अनुयायासह १४ ऑक्टोंबर, १९५६ रोजी बौध्द धम्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मतानुसार धर्माच्या कसोटीवर उतरणारा एकमेव धर्म आहे, तो म्हणजेच बुद्धधम्म होय.

तेव्हा आपण जो धम्म घेतला तो उत्तम रीतीने पाळण्याचा निर्धार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला असे होऊ नये म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे हे आपल्याला साधेल तर आपण आपल्याबरोबर देशाचा इतकेच काय तर जगाचाही उध्दार करु, कारण या धर्माचे लोन जागतिक पातळीवर उंचावले आहे. भारताच्या अलिकडील इतिहासात त्यांची कामगिरी उच्च श्रेणीची व चिरस्मरणीय अशीच आहे. अन ती दिवसेंदिवस वाढतच जाणारी आहे, हे त्यांच्या प्रखर विद्वत्त्वत्तेमुळे! बाबासाहेब म्हणजे महान चारित्र्यवान व्यक्ति, अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, इतिहासाचे विद्वान, अभ्यासक, बुध्दिमान, कायदेपंडीत, स्मृतीकार, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक, ग्रंथकार, निधडया छातीचा व मनोधैर्याचा समाज मार्गदर्शक, भगवान बुध्दांच्या कार्याचा संदेश सर्व जगात पसरविणारा, पददलितांचे स्फूर्ती व आशास्थान अशा या जागतिक कीर्तीच्या महामानवाला १३४ व्या जयंती निमित्त मानाचा मुजरा!

**ज्ञानपिपासू युगांधराच्या**
**आठवणींना स्मरू ।**
**मिळून आपण सारे**
**साजरी भीम जयंती करू ।।**

**– प्रविण बागडे, नागपूर**

# भद्रा मारोती मंदिरात हनुमान जन्मोत्सव सोहळा उत्साहात, काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता, पाच लाख भाविकांनी घेतले दर्शन



**खुलताबाद (अटूल मत प्रतिनिधी)**

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या खुलताबाद येथील श्री भद्रा मारोतीच्या दर्शनासाठी हनुमान जयंती निमित्त दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती, राज्याच्या कान्यकोपऱ्यातून आलेल्या भाविकांच्या गर्दीने मंदिर परिसर फुलून गेला होता,पवन पुत्र की जय, हनुमान की जय यासह जय भद्राच्या नामघोषात लाखो भाविकांनी भद्रा मारुतीचे दर्शन घेतले असल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांनी दिली. शनिवारी रोजी पहाटे चार वाजता अभिषेक व महापुजा या नंतर सकाळी सहा वाजेच्या सुमारास भद्रा मारुती मंदिर संस्थानचे सचिव राज्याचे मंत्री अतुल सावे,संस्थानचे अध्यक्ष मिठ्ठू पाटील बारगळ. उपाध्यक्ष रामनाथ बारगळ,सहसचिव खंडेराव बारगळ, विश्वस्त-चंद्रकांत खैरे, कचरू बारगळ, कुलभूषण अग्रवाल, कार्याध्यक्ष किशोर अग्रवाल ज्ञानेश्वर बारगळ बारगळ,यांच्या हस्ते झाली यावेळी जनसंपर्क अधिकारी राजेंद्र जोंधळे यांच्यासह संस्थानचे सर्व पदाधिकारी व हनुमान भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

हनुमान जयंतीनिमित शुक्रवारी सायंकाळ पासून औरंगाबाद, फुलंब्री,वेरुळ,कन्नड महामार्गासह खेड्या पाड्यातून मोठया प्रम णात भाविक भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी खुलताबाद नगरीत दाखल होण्यास सुरुवात झाली होती.या मध्ये औरंगाबाद परिसरातून येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय होती.

हनुमान जयंती निमित्त शुक्रवारी सायंकाळ पासूनच भाविकांचे जथेच्या जथे पायी दिंड्या,पालख्यासह हातात पताका,म शाल घेऊन जय भद्राचा नामघोष करीत खुलताबाद शहरात येण्यास प्रारंभ झाला होता, हनुमान जन्मोत्सवामुळे खुलताबाद शहराकडे येणारे सर्व रस्ते भाविक भक्तांच्या गर्दीने फुलून गेल्याचे चित्र पाहावयास मिळत होते,शहरात दाखल होताच भाविक श्री भद्रा मारोती चरणी नतमस्तक होत होते,या वर्षी हनुमान जन्मोत्सवासाठी औरंगाबाद कडून येणाऱ्या भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून आले. शनिवारी पहाटे चार वाजता भद्रा मारुतीचे मूर्तीस प्रथम पवित्र जलाने ब्राम्हवृदांच्या मंत्रोचारात जलाअभिषेक व शाहीस्नान घालण्यात आले,तदनंतर भद्रा मारुती मुर्तीची आकर्षक सजावट सुभाष धुळे. बाळू काळे व भक्तगणांनी भद्रा मारुती मुर्तीला वस्त्र व पगडी घालून फुल,हार यांनी आकर्षक सजवण्यात आली होती,या मुळे भद्रा मारुतीची मूर्ती अधिकच सुंदर दिसून येत होती.श्री हनुमान जन्मोत्सव सोहळ्या निमित्त भद्रा मारुती संस्थानच्या वतीने दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी अखंड हरिनाम साप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते,या अखंड हरिनाम सप्ताहा दरम्यान दररोज दुपारी संगीतमय तुलसी रामायण, हरिपाठ भाजन, यासह रात्री कीर्तन विविध कार्यक्रम झाले तर सप्ताहाची सांगता शनिवारी रोजी महंत रामगिरी महाराज सरलाबेट यांचे काल्याचे कीर्तन होऊन महा प्रसादाचे वाटप भाविकांना करण्यात आले.

भाविकांना दर्शनासाठी कुठला ही प्रकारची असुविधा होऊ नये या साठी संस्थानच्या वतीने बॅरिकेड्स लावण्यात आले होते व सावली साठी भव्य मंडप उभारण्यात आला होता. तसेच स्पेशल दर्शनाची हि व्यवस्था करण्यात आली होती. उन्हाळ्याचे दिवस असल्याने ठिक ठिकाणी पिण्याचे पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती तसेच मंदिर परिसरात येणाऱ्या भाविकांसाठी फराळची हि सोया करण्यात आली होती.

औरंगाबाद ग्रामीण पोलीस अधीक्षक विनय कुमार राठोड व अप्पर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या अधिपत्याखाली. उपविभागीय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकूरवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा चोख पोलीस बंदोबस्त मंदिर परिसरात तैनात केला होता,या मध्ये पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलिस निरीक्षक, पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे जवान असा बंदोबस्त ठेवण्यात आला होता तसेच संस्थांच्या वतीने ही खाजगी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. स्मार्ट सिटी बस व एस टी महामंडळाच्या वतीने विविध मार्गा वरून भाविकांच्या सोयीसाठी जादा बसगाड्यांची व्यवस्था करण्यात आली होती. भद्रा मारुतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना कुठल्याही प्रकारे असुविधेचा सामना करावा लागू नये यासाठी संस्थांच्या वतीने सर्वोतोपरी काळजी घेण्यात आली होती.

# पसायदान हेच मानवी जीवनाचे सार ह.भ.प सद्गुरू श्री चैतन्य महाराज देगलूरकर यांचे प्रतिपादन




**सेलू - संजय धारासूरकर (अटूल मत प्रतिनिधी)**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांनी रचलेले पसायदान हेच मानवी जीवनाचे सार आहे असे प्रतिपादन ह भ प चैतन्य महाराज देगलूरकर यांनी केले. येथील वसंत प्रतिष्ठान च्या वतीने पसायदान या विषयावर आयोजित प्रवचन मालेचे हे सहावे वर्ष आहे या प्रसंगी ते बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की, पसायदानात मानवी जीवन म ूल्ये व अलोकिकता या विषयी विवेचन केले आहे. जीवन कसे असावे व जीवन कसे जगावे याचे सखोल विवरण पसायदानता आहे. जीवनाची पूर्णता विषद करते ते पसायदान आहे.ज्या वेळी आपल्या अंतः करण मधून अहंकार निवृत्त होतो तीच आपल्या जीवनाची परमात्म्याला दिलेली खरी पूर्णतः आहे. जो जे जसे करील तसेच भरील हेच पसायदान आपल्याला सांगते.म ानवी जीवन अलोकिक व्हावं हेच यात अभिप्रेत आहे.असे ते म्हणाले. प्रारंभी दीप प्रज्वलन करून व ज्ञानेश्वर माउलींच्या तसेच सेलूभूषण स्व. वसंतराव खारकर मामा यांच्या प्रतिमेचे पूजन सद्गुरू चैतन्य महाराज यांनी केले. तर गुरु पूजन वसंत प्रतिष्ठान च्या वतीने प्रवचन मालेचे आयोजक उद्योजक महेश खारकर व एड उमेश खारकर यांनी केले. यशवंतराव चाराठाणकर यांच्या अवघ गर्जे पंढरपूर या अभंगवानी ने श्रोते मंत्रमुग्ध झाले.प्रास्ताविक आयोजक महेश खारकर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. संजय पिंपळगांवकर यांनी केले.

## विशेष दर्शनाद्वारे संस्थानला पाच लाखाची गंगाजळी-

भद्रा मारोती संस्थान तर्फे भाविकांसाठी ५० रुपये भरून विशेष दर्शन व्यवस्था केली होती,दहा हजार भाविकांनी याचा लाभ घेतल्याने संस्थानला पाच लाखाची गंगाजळी प्राप्त झाली.विशेष म्हणजे देशभरात एकीकडे औरंगजेबाच्या कबरीवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी पोलिस प्रशासनाने अत्यंत काटेकोर व नियोजनबद्ध बंदोबस्त लावण्यात आले होते. शहरातील जे रस्ते औरंगजेबाच्या कबरीकडे जात होते,ते संपूर्ण बैरिकेटिंग लावून बंद करण्यात आले होते. विशेष म्हणजे, ग्रामीण पोलिस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी शुक्रवारी रात्री स्वतः पायी चालत शहरात कायदा -सुव्यवस्थेची आढावा घेत पाहणी केली.तसेच अपर पोलिस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह गेल्या दोन दिवसांपासून खुलताबादमध्ये ठाण मांडून नियोजन पाहत होत्या.

# महामानवाचे स्मरण

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. १८९१ मध्ये ते जन्मले आणि १९५६ मध्ये वारले, पण या मधल्या काळात त्यांनी जगाला प्रचंड काही दिले. त्यांनी भारताला संविधान दिले. आज त्या संविधानाच्या बळावर तर कॉंग्रेससह अनेक विरोधी पक्ष उड्या मारत आहेत. पण आंबेडकर यांनी संविधानासारखी अद्भुत गोष्ट तर दिलीच, पण त्याशिवायही त्यांनी भारतावर एक उपकार केले आहेत. प्रत्येक भारतीयाने त्याचे कृतज्ञतापूर्व स्मरण केले पाहिजे. ती आहे ती म्हणजे त्यांनी देशाला मुस्लीम राष्ट्र होऊ दिले नाही. जेव्हा त्यांनी हिंदू म्हणून मरायचे नाही असे ठरवले तेव्हा अनेक धर्म त्यांच्या पुढे पदर पसरून तुम्ही आमचा धर्म स्वीकारा म्हणून स्वागतार्थ पायघड्या घातल्या होत्या. त्यात मुस्लीमही होते. पण बाबासाहेबांनी तसला अविचार केला नाही व बौद्ध धर्म स्वीकारला आणि देशाचे आज एक अनोखे रूप आपण पाहत आहोत. यामागे बाबासाहेबांचे विचार आणि त्यांची दूरदृष्टी आहे. बाबासाहेबांनी देशाला एक फार मोठी बाब दिली आहे ती म्हणजे या देशाची घटना. संविधानाच्या जोरावर आज जे राहुल गांधी आणि तमाम कॉंग्रेसजन उड्या मारत आहेत त्यांना बाबासाहेबांनी ही भेट दिली आहे. तिचा दुरुपयोग कसा केला हे आपण पाहातच आहोत. पण बाबासाहेबांनी या देशाला संविधान रूपी शस्त्र देऊन तमाम भारतीयांना फार मोठे साधन दिले आहे. बाबासाहेबांनी भारतावर अनेक प्रकारे उपकार केले आहेत त्यापैकी एक आहे ती म्हणजे त्यांनी जीवनभर वंचित आणि शोषितांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या उत्थानासाठी संघर्ष केला. त्यांनी त्यासाठी समाजातील शोषित आणि वंचित अशा दलित समाजातील वर्गात जागृती केली आणि भारतीय संविधान तयार करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

हिंदू म्हणून जन्मलो असलो तरीही हिंदू म्हणून मरणार नाही हे वाक्य त्यांनी तंतोतंत पाळले आणि बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्यांच्यासमवेत त्यांच्या लाखो अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. १४ ऑक्टोबर १९५६ या दिवशी त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि त्यांच्यासमवेत तीन लाख ६५ हजार अनुयायांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदू धर्मात जात्यंधता आणि इतर अनेक दुर्गुण होते त्यामुळे बाबासाहेबांना धर्म बदलावा लागला पण त्यांचा धर्मपरिवर्तनाचा निर्णय १९३६ मध्येच झाला होता असे इतिहास सांगतो. दलितांच्या उत्थानात हिंदू असणे हा मोठा अडसर आहे असे त्यांचे मत होते. हिंदू धर्माची जातीयता आणि जातीची उतरंड त्यांना न पटणारी होती आणि त्यामुळे त्यांनी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. पण त्यांना अन्य कोणताही धर्म स्वीकारावा वाटला नाही हे त्यांचे मोठेपण होते. आपण त्याच्याबद्दलल बोलताना त्यांचे हे मोठेपण कधीच मान्य करत नाही. त्यांचे बौद्ध धर्मात प्रवेश करणे ही हिंदूंची जातीव्यवस्था नाकारण्याची प्रतिक्रियात्मक आणि लाक्षणिक कृती होती आणि त्यांनी समानतेच्या प्रति असलेली कटिबद्धतेशी सुसंगत होती. त्यामुळे त्यांच्या या कृतीकडे केवळ धर्मपरिवर्तन म्हणून न पहाता हिंदू धर्मातील दोष काढून टाकण्याच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. बाबासाहेबांनी लाखो दलितांच्या लेकरांना स्वतःच्या सामर्थ्याची जाणीव करून दिली आणि एक प्रकारचे आत्मभान दिले असे म्हणावे लागेल. बाबासाहेब विद्वान तर होतेच. त्यांनी त्यांचे ग्रंथालय अद्ययावत अशा ग्रंथांनी सुसज्ज केले होते आणि त्यांचे परिशीलन त्यांनी आयुष्यभर केले. त्यांनी सतत समानतेसाठी आणि समाजातील जातीभेद दूर करण्यासाठी काम केले त्याला तोड नाही. आज त्यांची गरज प्रकर्षाने जाणवते आहे कारण आज समाजात जातिभेद प्रचंड प्रमाणात फोफावला आहे आणि उच्चनीच भेद प्रचंड प्रमाणात वाढले आहेत. त्यामुळे आज तर बाबासाहेबांची गरज तर जास्तच जाणवते आहे.

बाबासाहेबांनी धर्म परिवर्तन केवळ हौस किंवा लहर म्हणून केले नाही तर त्यामागे संयुक्तिक कारण, नैतिकता आणि न्याय ही तत्वे होती. याच तत्वांसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले आणि संघर्ष केला. बाबासाहेबांनी समाजातील जातीयता नष्ट करण्यासाठी चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आणि ती भूमी आज परमपवित्र भूमी म्हणून महाडमध्ये गणली जाते. दलित समाजाच्या व्यक्तींना माणूस म्हणून दर्जा मिळवून देणे आणि त्यांचा आत्मसन्मान वाढवणे हे त्यांच्या या कार्याचा लसावि होता असे म्हणावे लागेल. आपल्या पुस्तकात अनिहिलेशन ऑफ कास्ट या पुस्तकात त्यांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्थेवर कोरडे ओढले आहेत. बाबासाहेबांनी बौद्ध धर्मात प्रवेश का केला यावर आजही चर्चा होत असतात. पण काही विद्वानांच्या मते त्यांनी आकसाने बौद्ध धर्मात प्रवेश केलेला नाही, तर त्यांनी हिंदू धर्माला सुधारण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांन त्यात यश आले नाही असे म्हणून ठेवले आहे. या महामानवाला वंदन करण्यामागे त्यांचे केवळ बौद्ध धर्म स्वीकारणे हेच एक कार्य नव्हते तर त्यांनी अनेक दिग्गज हिंदू नेत्यांशी चर्चाही केली होती. त्यात सावरकर होते तसेच टिळकांचा मुलगाही होता. त्यामागे बाबासाहेबांनी आकसाने बौद्ध धर्म स्वीकारला असे म्हणणे चूक आहे. त्यांनी राजकारण केले आणि पहिले ते देशाचे कायदामंत्री होते. त्यांनी समाजाचे प्रबोधन केले आणि हिंदू धर्मावर कोरडे ओढले. पण हिंदू धर्मामुळे त्यांचे कधीही समाधान झाले नाही आणि शेवटी त्यांनी हिंदू धर्म सोडण्याचा निर्णय घेतला. बाबासाहेब आजही महत्त्वाचे आहेत कारण त्यांनी जी शिकवण दिली आहे तिची आज गरज कधी नव्हे ती जास्त आहे. ६५ वर्षांच्या आयुष्यात बाबासाहेबांनी दलितांना आत्मसन्मान दिला आणि त्यांना शिकले तरच त्यांचा टिकाव लागेल हे तत्त्व शिकवले. त्यांनी राखीव मतदारसंघांचा आग्रह धरला आणि त्यासाठी महात्मा गांधी आणि आंबेडकर यांच्यात करारही झाला. पण कॉंग्रेसने तो करार उधळून लावला आणि कॉंग्रेसने कधीही दलितांना बरोबरचे स्थान दिले नाही. केवळ भाषा मात्र त्यांच्या कल्याणाची करायची आणि पंगतीत त्याचा अपमान करायचा हे शेतकरी नेते नारायण नागू पाटील यांनी आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहे. आपल्या ६५ वर्षांच्या काळात आभाळाएवढे कार्य करणाऱ्या बाबासाहेबांना त्रिवार वंदन.

# महावीर भवनातील प्रश्नमंच स्पर्धेस उत्स्फूर्त प्रतिसाद



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

भ.महावीर जन्म कल्याणक महिला समिती अंतर्गत भ. महावीर भवन येथे झालेल्या आदर्श, लब्धी, वर्धमान, गुरु गणेश, सुशील, प्रभा किरण, नवकार आदी स्थानकवासी महिला तसेच बहु मंडळातर्फे धार्मिक - सामान्यज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. यात ८० स्पर्धकांनी सहभाग नोंदवीला.

प्रश्नमंच स्पर्धेमध्ये भ. महावीर जीवनकार्य, पौराणिक, राजकिय, सामाजिक, जागतिक घडामोडी आदी विषयांवर विविध प्रश्न विचारले होते. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी भारती बागरेचा, पुष्पा बाफना, डिंपल पगारिया, कलाबाई आचलिया, डॉ. निर्मला मुथा, वंदना डोशी, रूपाली कुंकूलोळ आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मंगल पारख यांनी केले. भावना सेठिया, साधना शहा, नीता गादिया, पल्लवी शहा आदींनी सहकार्य केले. प्रारंभी भारती बागरेचा, स्वप्नील पारख, मिठालाल कांकरिया, झुंबरलाल पगारिया, कौशिक सुराणा, संगीता संचेती, सारिका साहुजी, करूना साहुजी मनीषा भन्साळी, सविता लोढा, मधु जैन, तनुजा गांधी, मेघा सुगंधी, प्रतीक साहूजी, पंकज साकला, बाहुबली वायकोस आदींच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

अशी माहिती स्पर्धा प्रसिद्धीप्रमुख प्रशांत शहा नरेंद्र अजमेरा पियुष कासलीवाल यांनी दिली.

# महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार समजून घेवून त्यांच्या विचारांचे व्यवस्थात्मक विश्लेषण करणे आवश्यक - डॉ. राहुल कोसंबी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**




दि.१२ एप्रिल २०२५ म.शि.प्र.मंडळ संचालित देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर आयोजित महात्मा जोतीराव फ ुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव निमित्ताने 'आंबेडकरी जलसा' व युवा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक व प्रा. राहुल कोसंबी यांचे 'म हात्मा जोतीराव फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे समाज परिवर्तनाचे विचार : सातत्य आणि बदल' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

या जयंती महोत्सवाच्या निमित्ताने संगीत विभागातील कलावंत विद्यार्थ्यांनी आंबेडकर जलसाचे बहारदार सादरीकरण केले. या आंबेडकरी जलसा चे उद्घाटन महाविद्यालय विकास समिती ज्येष्ठ सदस्य श्री. पंडितराव हर्षे यांच्या हस्ते झाले. यामध्ये देवगिरी महाविद्यालयाच्या देवगिरी महाविद्यालयातील संगीत विभागातील विद्यार्थी कलावंतांनी आंबेडकरी जलसा आणि भीम गीतांचे सादरीकरण करुन रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून म. शि. प्र. मंडळ केंद्रीय कार्यकारिणी सदस्य श्री. त्रिंबकराव पाथ्रीकर उपस्थित होते. विचार मंचावर उपप्राचार्य डॉ. रवी पाटील, डॉ. अपर्णा तावरे, डॉ. गणेश मोहिते व संगीत विभागप्रमुख प्रा. शैलेजा कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे समाज परिवर्तनाचे विचार : सातत्य आणि बदल या विषयावर मांडणी करताना महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना व्यक्ती म्हणून समजून घेऊन त्यांच्या विचारांची चिकित्सा झाली पाहिजे. या दोघांनी भारतात प्रबोधनाची सुरुवात केली. भारतातील धर्मपरंपरा, जातीव्यवस्था, अंधश्रद्धा, शिक्षण, पितृसत्ताक पद्धती या सर्व व्यवस्थात्मक शोषण पद्धती व तत्कालीन शासन याचे व्यवच्छेदन फुले आणि आंबेडकरांनी केले आहे. बाबासाहेबांच्या विचारांमध्ये महात्मा फुलेंच्या विचाराचे प्रतीक होते. महात्मा फुले हे मुलींच्या शिक्षणाकडे, शूद्रअतीशूद्र यांच्या शिक्षणाकडे का वळले याचे उत्तर आपल्याला तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये सापडते. एकोणिसाव्या आणि विसाव्या शतकामध्ये धर्म, जातीव्यवस्था, तत्कालीन समाज रचना, समाज व्यवस्थेम धून झालेली शोषण व्यवस्था यासंबंधीचे पद्धतशीर विश्लेषण महात्मा फुले नंतर डॉ. आंबेडकर यांनी केले. जात संबंध, स्त्रियांचे शिक्षण, जात आणि पित्रसत्ताक कुटुंब पद्धती मधून स्त्रियांच्या लैंगिकतेचे दमण जातीव्यवस्थेने केले होते त्याविषयी फुले आणि आंबेडकर यांनी आपल्या आपल्या स्तरावर अमुलाग्र बदल घडविण्याचे कार्य केले. महात्मा फुलेंनी समाज विश्लेषणातून शिक्षणाची कास धरली तर बाबासाहेब आंबेडकरांनी धर्ममध्ये अपेक्षित बदल कसे करता येतील यासंबंधी प्रयत्न केले. चवदार तळे सत्याग्रह, काळाराम मंदिर सत्याग्रह ही त्याची उदाहरणे आहेत. फ ुलेंनी निर्मिक, संकल्पना जाणीवपूर्वक निम ाण केली तर बाबासाहेबांनी १९५६ मध्ये बौद्ध धर्माचा पर्याय दिला. फुले आणि आंबेडकरांचे विचार हा जातीअंताकडे जाणारा विचार आहे. फुलेची चळवळ ही सामाजिक आहे आणि या यावर शिक्षण हाच एक उपाय आहे. व बाबासाहेबांची चळवळ सामाजिक तसेच राजकीय आहे. बाबासाहेबांनी राजकीय पटलावर येऊन दलित उद्धारासाठी प्रयत्न केले असे विचार राहुल कोसंबी यांनी मांडले. समारोपामध्ये श्री.त्रिंबकराव पाथ्रीकर यांनी डॉ.आंबेडकर यांनी शेतकऱ्यांना सावकारी जाचातून मुक्त करण्यासाठी लढा उभारला तसेच महात्मा फुले यांची कौटुंबिक पार्श्वभूमी व डॉ. आंबेडकराची पार्श्वभूमी या संबधी लक्ष वेधले व आजच्या बुद्धिजीवी वर्गाविषयी त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व विषयी चिंता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाळासाहेब निमर्ळ यांनी केले तर आभार डॉ. अनंत कनगरे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी उपप्राचार्य प्रा. सुरेश लिपाने, प्रा.विजय नलावडे तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी विद्यार्थी उपस्थिती होते.

# संवाद मराठवाड्याशी उपक्रमांतर्गत विभागीय आयुक्त दिलीप गावडे नागरिकांशी संवाद साधणार



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातील गरजू नागरिक आपल्या वार्डातील अडचणी घेऊन विभागीय आयुक्त कार्यालयात प्रशासकीय अधिकारी यांच्या भेटीसाठी, निवेदने देण्यासाठी येतात. मात्र विभागीय पातळीवरील अधिकारी अनेकदा कामानिमित्त दौऱ्यावर किंवा अन्य कामामुळे त्यांची भेट होत नाही, हीच बाब विचारात घेत विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी गरजू नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे थेट संवाद साधण्यासाठीचा उपक्रम हाती घेतला आहे. १५ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या समाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी विभागीय आयुक्त संवाद साधणार आहेत.

विभागीय आयुक्त श्री गावडे यांच्या संकल्पनेतून 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' या उपक्रमाची सुरूवात झाली आणि संपूर्ण प्रशासन थेट गावात पोचले. या उपक्रमाच्या यशानंतर विभागीय आयुक्त श्री गावडे यांनी मराठवाडा विभागातील आठही जिल्हयातून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशासकीय कामानिमित्त येण्यासाठी नागरिकांना होणारा त्रास थांबविण्यासाठी नागरिकांशी ऑनलाइन वेबिनारद्वारे 'संवाद मराठवाड्याशी' या उपक्रमाची सुरूवात करण्याचा निर्णय घेतला आहे. १५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता विभागीय आयुक्त श्री गावडे नगरपालिका क्षेत्रात वार्ड भेट समस्या सम ाधान अभियानाच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधणार आहेत. श्री. गावडे यांच्यासमवेत यावेळी विभागीय पातळीवरील प्रशासकीय अधिकारी उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे, नगरपरिषद सह आयुक्त देविदास टेकाळे, नगर प्रशासन विभागाच्या ॲलिस पोरे, संजय केदार उपस्थित असणार आहेत. प्रत्येक आठवड्यात संवाद साधला जाणार आहे. प्रत्येक संवादावेळी प्रशासकीय विभाग व विषय ठरविण्यात येणार असून यावेळी नगर विभाग विभागाच्या सबंधित विषयावर विभागीय आयुक्त श्री गावडे नागरिकांशी संवाद साधणार आहेत. नागरिकांनी नगर विकास विभागाशी सबंधित योजना, प्रश्न, असलेल्या अडचणी, योजनेच्या अंमलबजावणीचे धोरण तसेच याबाबत असलेल्या अडचणीबाबत थेट विभागीय आयुक्त यांच्याशी संवाद साधता येणार आहे. नागरिकांनी या उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे अवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. याबाबतचा क्युआर कोडही प्रसिद्ध करण्यात येत आहे. नागरिकांना आपल्या मोबाईलव्दारे या उपक्रमात सहभागी होता येणार आहे.

# एका युगप्रवर्तक परिवर्तनाचा प्रवास येत्या २५ एप्रिलला उलगडणार!

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

'फुले' चित्रपटाचे निर्माते प्रणय चोक्शी, जगदीश पटेल, रितेश कुडेचा,अनुया चौहान कुडेचा, सुनील जैन आणि डॉ. राज खवारे असून, सहनिर्मितीची जबाबदारी क्रांती शानभाग, कलापी नागडा,रोहन गोडांबे, परीधी खंडेलवाल यांनी उचलली आहे.

एका युगप्रवर्तक परिवर्तनाचा प्रवास येत्या २५ एप्रिलला उलगडणार!

मुंबई : नव्या पिढीला ऐतिहासिक गोष्टींची माहिती मनोरंजनातून व्हावी यासाठी अनेक दिग्दर्शक पुढे येत आहेत. छावा या छत्रपती संभाजी महाराजांच्या चरित्रावर आधारित चित्रपटानंतर झी स्टुडिओजब प्रस्तुत, डान्सिंग शिवा फिल्म्स आणि किंग्जमेन प्रोडक्शन्स निर्मित यांच्या माध्यमातून ' फुले' हा हिंदी चित्रपट जगभर येत्या २५ एप्रिल २०२५ रोजी देशभर प्रदर्शित होत आहे. म हात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे स्त्री शिक्षण, जातिनिर्मूलन आणि सामाजिक परिवर्तनासाठीचे कार्य या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे.

# महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या शहर उपसचिवपदी सचिन हिवराळे तर खूलताबाद तालुका संघटकपदी पंकज कोतकर



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या शाहर सचिवपदी सचिन हिवराळे यांची नियुक्ती करण्यात आली तर खुलताबाद तालुका संघटक पदी पंकज कोतकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले

महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी राहुल जी.वडमारे यांच्या अध्यक्षतेखाली सुभेदारी विश्रामगृहावर ०८/०४/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. या आढावा बैठकीत जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व उपस्थित पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी यांना येणाऱ्या काळात महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची बांधणी मजबूत कशी करायची गाव तेथे शाखा महाराष्ट्र पक्षाची झाली पाहिजे या सर्व बाबींवर सखोल चर्चा केली व या बैठकी दरम्यान या नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांच्या हस्ते नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीची पत्रे देण्यात आली. यावेळी पक्षाचे जिल्हासंघटक रतन जाधव यांच्या हस्ते शाल व पुष्पहार टाकून सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती, जिल्हा सचिव बापूसाहेब चाबुकस्वार व ज्येष्ठ नेते महेंद्र गवई यांची होती बंडू तांदळे,अनिल इंगळे, अमित देशमुख, मुकेश मकासारे, मनोज पगारे, विकास तायडे आदींची उपस्थिती होती.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबंधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.